Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985


Volume - 11 No - 1 Issue - 33 Jan-April 2023 ISSN-2347-9639

39Years

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

IIJIF
Impact Factor
2.283



महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

संपादक

प्राचार्य डॉ. प्रमोद पवार

प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. लियाकत खान । डॉ. विठ्ठल दहिफळे

महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद

Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985

# VICHAR MANTHAN
# विचारमंथन

National Research Journal of Political Science and Public Administration
(A Peer Reviewed Journal)
Vol. - 11, No - 1 Issue - 33 Jan.-April 2023 ISSN- 2347-9639

♦ Editor ♦

Prin. Dr. Pramod Pawar

Prin. Dr. Manohar Patil
Prof. Dr. Liaqat Khan
Prof. Dr. Ravindra Bhanage
Prin. Dr. Bal Kamble
Dr. Vitthal Dahiphale
Dr. Sandip Nerkar

♦ President ♦
Prin. Dr. Pramod Pawar
Email : pramodpawar1761@gmail.com
Mob : 9423582073

♦ Secretary ♦
Prin. Dr. Manohar Patil
Email : manoharpatil123@gmail.com
Mob : 9422287053

♦ Guided by ♦
Prin. Dr. P. D. Deore
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13
Mob : 9423980457

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
Visit Us : vicharmanthanjournal.org
E-mail : vicharmanthanjournal@gmail.com

39 Year's

Maharashtra Political Science & Public Administration Conference's

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration

(A Peer Reviewed Journal)

♦ Advisory Editors ♦

Dr. Sham Shirsat (Aurangabad)
Dr. Prakash Pawar (Kolhapur)
Dr. Kusum More (Latur)
Dr. Prashant Amrutkar (Aurangabad)
Dr. Chaitra Redkar (Mumbai)
Dr. Urmila Chavhan (Meeraj)
Dr. Jyotsna Sonkhaskar (Nashik)
Dr. Nandaji Satpute (Gadchiroli)
Dr. Vinod Gaikwad (Shegaon)
Dr. Sandeep Kale (Selu-Vardha)
Dr. Meera Phad (Nanded)
Dr. Sangram More (Latur)
Dr. Prashant Vighe (Paratwada-Amrawati)
Dr. Sachin Patil (Sangali)
Mr. Dattatray Wabale (Pune)
Dr. Liaqat Khan (Mumbai)
Dr. Ravindra Bhanage (Kolhapur)
Dr. Alka Deshmukh (Nagpur)
Dr. Balasaheb Bhosale (Tasgaon)
Dr. Ashok Naikwade (Aurangabad)
Dr. Vilas Awari (Kopergaon)
Dr. Mohan Kashikar (Nagpur)
Dr. Pramod Shambharkar (Chandrapur)
Dr. Vakil T. Shaikh (Koradi-Nagpur)
Dr. Suresh Bhalerao (Parbhani)
Dr. Hanumant Phatak (Baramati-Pune)
Dr. Manik Sonawane (Pune)
Dr. Sanjay Gore (Gadchiroli)
Dr. Pyarelal Suryawanshi (Amravati)
Mr. Mahesh Birhade (Raigad)

♦ Hon'ble Guest Editors ♦

Dr. Sushama Yadav (New Delhi)
Dr. Subhash Chandrakar (Raipur)
Dr. Anita Deshpande (Bhopal)
Dr. Sunilkumar Goyal (Khandwa)
Dr. J. Prabhash (Kerala)
Dr. B. Chandrashekhar (Hydrabad)
Dr. Sanjeevkumar Sharma (Meerut)
Dr. Shilpi Bose (Raipur)
Dr. Garima Jawualkar (Bhopal)
Dr. Ketan Govekar (Panji-Goa)
Dr. Shaikh Abul Barkat (Hydrabad)
Dr. Baldev Agja (Gujrat)

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
Visit Us : vicharmanthanjournal.org E-mail : vicharmanthanjournal@gmail.com

39 Year's

Maharashtra Political Science & Public Administration Conference's

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration

(A Peer Reviewed Journal)

## Peer Reviewed Committee

**Prin. Dr. Pramod Pawar** (Amalner)
**Email :** pramodpawar1761@gmail.com

**Prin. Dr. Manohar Patil** (Dhule)
**Email :** manoharpatil123@gmail.com

**Dr. Vitthal Dahiphale** (Nanded)
**Email :** vithaldahiphale8@gmail.com

**Dr. Sanjay Wagh** (Kalyan)
Email : smwagh2009@gmail.com

**Dr. Viqar Shaikh** (Jalgaon)
**Email : skviqar@rediffmail.com**

**Prof. Dr. Ravindra Bhanage** (Kolhapur)
**Email :** ravindrabhanage@gmail.com

**Prin. Dr. Bal Kamble** (Karjat - Pune)
**Email :** bal.kamble@yahoo.in

**Dr. Liaqat Khan** (Mumbai)
**Email :** liyaqatkhan69@gmail.com

**Dr. Sambhaji Patil** (Shindkheda)
**Email :** sspatil2011@gmail.com

**Dr. Gautam Bhalerao** (Jalgaon)
**Email :** gdb5579@gmail.com

**Dr. Sandip Nerkar** (Amalner)
**Email :** sbnpca@gmail.com

## Guided by

**Prin. Dr. P. D. Deore**
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, **Nashik-13**
Mob : **9423980457**

## Managing Editor

**Mr. Yuvraj Mali** (Jalgaon)

♦ **Publishers** ♦

**Atharva Publications**

**Head Office :**
Shop No. 2, 'Nakshtra' Apartment, Housing Society, Shahunagar, Jalgaon - 425001. **Ph.No. 0257-2239666**

**- Branches -**

**New Delhi** - 213, Vardan House, 7/28, Ansari Road, Daryaganj, New Delhi - 110002. **Mob. 07503171077**

**Mumbai - Ashirwad Building, 1007, 10th floor, N.M. Nagar, Behind Tardeo Police Station,**
Tardeo, Mumbai - 400034. **Mob. 9969392245**

**Pune** - Dhayri, Benkar Nagar, Pune - 411041. **Mob. 9834032015**

'विचारमंथन' या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झालेली मते संपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक आणि सल्लागार मंडळ यांना मान्य असतीलच असे नाही. या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांतील लेखकांची मते ही त्यांची वैयक्तिक मते आहेत, तसेच शोधनिबंधाची जबाबदारी ज्या-त्या लेखकावर राहील.

मेसर्स अथर्व पब्लिकेशन्सच्या वतीने कार्यकारी संपादक श्री. युवराज माळी यांनी शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी, तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव - ४२५ ००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले व आविष्कार प्रिंटर्स, अयोध्यानगर, जळगाव येथे मुद्रित केले. मोबाइल : ९४०५२०६२३०, फोन : ०२५७-२२३९६६६.

# लेखकांना आवाहन

राज्यशास्त्र, लोकप्रशासन, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, संरक्षणशास्त्र, अर्थशास्त्र,
वृत्तपत्रे या सामाजिकशास्त्रे विषयाचे विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक,
विचारवंत, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांनी आपले लेखन

# विचारमंथन

या राष्ट्रीय स्तर संशोधन पत्रिकेसाठी पुढील ईमेल वर पाठवावे.

**vicharmanthanjournal@gmail.com**

लेख, शोधनिबंध – Format of Research Paper - A4 Size, MS WORD - 2007,
मराठी/हिंदी – Font - ISM-DVB-TTSurekh- Font Size-14 Or
Unicode - Font Size-14
English - Times New Roman, Font Size - 12

**प्रथम शोधनिबंध वरील ईमेल वर पाठवावे.**

आपला पेपर Peer Reviewed Committee कडून निवड झाल्याचे कळवल्यानंतर आपला शोधनिबंध प्रकाशित केला जाईल. सहभागी लेखनकर्त्यास विचारमंथनचा अंक पाठवला जाईल. त्यासाठी आपल्या संशोधन पेपर सोबत आपला संपूर्ण पत्ता, पिन कोड, महाविद्यालयाचे नाव आणि ई-मेल व मोबाइल नंबरसह पेपर पाठवावा.

**विचारमंथन रिसर्च जर्नल सदस्य फी : वर्षातून तीन अंक**

: **वैयक्तिक** : पाच वर्षांकरिता २००० रु.

: **संस्था** : पाच वर्षांकरिता ३००० रु.

**आपली वर्गणी पुढील खात्यावर जमा करावी**

Account Name : **'Editor, VicharManthan'**
Bank Name : **Bank of Maharashtra,**
Branch : **College Campus Branch, Jalgaon** (Code:01161)
Account No : **60269111094**
IFSC Code : **MAHB0001161**
**Prin. Dr. Pramod Pawar** Mob: 9423582073
**Prin. Manohar Patil** Mob: 9422287053

Correspondance Address
**"AAKANKSHA" Plot No. 01, Siddhi Vinayak Colony, Asava Nagar, Pimprala Road, JALGAON - 425 001 (Maharashtra)**

# * अनुक्रमणिका *


१. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने ........ १
*प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे*

२. कर्मयोगिनी शांताबाई दाणी यांचे शिक्षणविषयक विचार व कार्ये ........ १२
*प्रा. वासुदेव गोविंदा मेश्राम*

३. न्यायाधीशांची नियुक्ती : न्यायालयीन स्वातंत्र्याचा एक महत्त्वाचा मुद्दा ........ १७
*विश्वंभर धर्मा गायकवाड*

४. भारत जोडो यात्रा – एक विहांवलोकन ........ २३
*डॉ. व्ही. एच. भटकर*

५. स्त्रीवादविषयक विचार ........ २६
*प्रा. कु. डिबरे रोहिणी बळीराम*

६. भारत जोडो यात्रेचा काँग्रेस पक्ष भवितव्यावरील परिणाम ........ २८
*प्रा. डॉ. महेंद्र पाटील*

७. नवीन शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठे (चॉईस बेस क्रेडिट सिस्टिम) ........ ३०
*प्रा. डॉ. विनोद को. गायकवाड*

८. लोकशाहीतील प्रसारमाध्यमांची भूमिका ........ ३४
*डॉ. आबासाहेब आर. कसबे*

९. जातिव्यवस्थेपुढील आव्हाने व सामाजिक गुंतागुंत ........ ३७
*सारिका धनपाल माळगे*

१०. कराड शहरातील स्त्री–पुरुष नगराध्यक्षांचा तुलनात्मक अभ्यास (१९९३ ते २०१८) ........ ४२
*तृप्ती रमेश मोरे*

११. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका ........ ४५
*प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे*

१२. भारताचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ........ ४९
*प्रा. डॉ. कांतीलाल डी. सोनवणे*

१३. कोरोना संकट आणि भारतीय अर्थव्यवस्था ........ ५२
*प्रा. डॉ. प्रफुल्ल ए. राऊत*

१४. स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक चळवळींचे महत्त्व ........ ५६
*श्री. सोमनाथ जाधव*

१५. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने ........ ६१
*प्रा. डॉ. अनंत मदन आवटी*

१६. रोहिंग्या निर्वासित आणि भारतीय अंतर्गत सुरक्षा : एक अध्ययन ........ ७१
*डॉ. उमेश अशोक गोगडिया*
*बाबासाहेब कैलास जाधव*

१७. भारतातील राजकीय पक्षपद्धती आणि प्रादेशिक राजकीय पक्षांचा प्रभाव ........................ ७७
*प्रा. डॉ. कल्पना एस. गोडघाटे*

१८. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षिततेसमोरील आव्हाने ........................ ८०
*प्रा. प्रवीण कारभारी शिंदे*

१९. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताचे २०१४ नंतरचे परराष्ट्र धोरण ........................ ८५
*प्रा. प्रशांत ज्ञानेश्वर देशमुख*

२०. भाजप शासन काळात भारतातील दहशतवाद ........................ ९१
*प्रा. डॉ. नागेश खुशालराव गायकवाड*

२१. भारताची आर्थिक व्यवस्था ........................ ९५
*जब्बार खलील शेख*

२२. भारत जोडो यात्रेचे सिंहावलोकन ........................ ९८
*प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे*

२३. **India and Infant Mortality Rate** ........................ **101**
*Shivaji Ganpat Gangurde*

२४. **Indian Politics and Political Movements : Special Reference to Bharat Jodo Yatra** ........................ **104**
*Argade Ambadas*

२५. लोक कल्याणकारी राज्य ........................ १०९
*लालजीराम मीना*

२६. भारत–पाकिस्तान सम्बन्धों में आतंकवाद ........................ ११४
*राजकुमार वर्मा*

२७. भारतीय संविधान: कलम ३७० चा अभ्यास ........................ ११५
*प्रा. डॉ. अविनाश पांचाळ*

२८. शांततामय असहमतीच्या राजकारणात आण्विक शस्त्रास्त्र विरोधी चळवळीची भूमिका ........................ ११८
*प्रा. डॉ. सुरेश भालेराव*

२९. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची राजकीय संसूचन पद्धती ........................ १२१
*प्रा.भक्ती राजेंद्र पाटील*

३०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील योगदान ........................ १२६
*प्रा. डॉ. एस.एम. वाघ*
*ज्योती श्रीराम डोंगरे*

# भाजप शासन काळात भारतातील दहशतवाद

**प्रा. डॉ. नागेश खुशालराव गायकवाड**
राज्यशास्त्र विभागप्रमुख, एस. पी. एम. तात्यासाहेब महाजन कला व
वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि.बुलढाणा.

आज जगामध्ये शांततेचा भंग करणारी व विकास प्रक्रियेला अडथळा निर्माण करणारी प्रमुख समस्या म्हणून दहशतवादाकडे बघितले जाते. आजच्या स्थितीत जगामध्ये काही देशांकडे जेवढी अत्याधुनिक शस्त्र–अस्त्रे नाहीत त्यापेक्षा जास्त अत्याधुनिक शस्त्रे–अस्त्रे दहशतवादी संघटनांकडे आहेत. त्यामुळे संपूर्ण जगाला भीती वाटावी, अशी स्थिती निर्माण झाली आहे. म्हणून जो बायडन (अमेरिकन राष्ट्राध्यक्ष) म्हणतात, पाकिस्तान विश्वासपात्र देश नाही, कारण पाकिस्तान सातत्याने दहशतवादी संघटनांना अभय देत आलेला आहे. भारतात आजपर्यंत जेवढ्याही दहशतवादी घटना घडल्या, त्या सर्व पाकिस्तान पुरस्कृत होत्या याचे पुरावे भारताने सातत्याने जागतिक स्तरावर सादर केलेले आहेत. तरीही चीनच्या धोरणामुळे पाकिस्तानमधील दहशतवादी नेत्यांवर आजपर्यंत योग्य ती कार्यवाही करता आलेली नाही. भारतात स्वातंत्र्यानंतर लगेचच काही वर्षांपासून दहशतवादी घटना सुरू झाल्या. सुरुवातीला भारतीय सरकारने त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, परंतु नंतरच्या काळात भारताने त्यासाठी सक्षम यंत्रणा उभारून त्याला आळा घालण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. पुढे भारतात हिंदू विचारधारा असणारे भाजप सरकार सत्तेत आले. त्याचा परिणाम दहशतवादी संघटनांनी हे मुस्लीमविरोधी सरकार आहे, असा विचार पेरून दहशतवाद आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न केला. याउलट भाजप सरकारनेसुद्धा दहशतवाद संपविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. परंतु तरीही आज भारतात दहशतवादी घटना घडतच आहेत. त्यामुळे भाजप शासन काळात घडलेल्या दहशतवादी घटना व त्यांनी दहशतवाद संपविण्यासाठी केलेले प्रयत्न पाहणे आवश्यक ठरते.

**संशोधनाचा उद्देश**

प्रस्तुत शोधनिबंधात दहशतवादी संघटनेचा हिंदू विचारधारेला असणारा विरोध लक्षात घेऊन भाजप पक्षावर काय रोष आहे व भाजपाने दहशतवाद रोखण्यासाठी काय प्रयत्न केले आहेत. हे जाणून घेण्याचा उद्देश आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके, वर्तमानपत्रे व वेबसाईट इत्यादी साधनांचा आधार घेतला आहे.

**दहशतवाद म्हणजे काय?**

राजकीय हेतू साध्य करण्यासाठी हिंसाचाराचा वापर करणे म्हणजे प्राथमिक दहशतवाद म्हणता येईल. थोडक्यात आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकांना भीती व धाक दाखवून त्यासाठी हिंसाचाराचा वापर करणे म्हणजे दहशतवाद होय. दहशतवाद या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील टेरॉर या शब्दापासून झालेली आहे. लॅटिन भाषेतील टेरॉर म्हणजे भीती दाखविणे होय किंवा दहशतवाद पसरविणे होय. काही राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्याविरुद्ध केलेला सुसंघटित हिंसाचार म्हणजे दहशतवाद होय. यासंदर्भात जॉन क्रेटम म्हणतात, ''राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भीती आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसात्मक गुन्हेगारी म्हणजे दहशतवाद होय.''

**भारतातील दहशतवादाच्या काही प्रमुख घटना**

१. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी खलिस्तानवादी संघटनेच्या दोन अंगरक्षकांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या केली.
२. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमध्ये लिट्टेच्या दहशतवादी पथकाने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या केली.
३. १२ मार्च १९९३ रोजी मुंबई येथे बॉम्बस्फोट झाले, त्यात २७२ लोक ठार झाले.

४. बाबरी मस्जिद पडल्यानंतर गुजरात, मुंबई आणि देशात इतरत्र मोठ्या प्रमाणात दंगली घडून आल्या.
५. २५ डिसेंबर १९९९ रोजी काठमांडूतून इंडियन एअर लाइन्सचे विमान अपहरण करून ते कंधारला नेले.
६. १३ डिसेंबर २००१ रोजी नवी दिल्लीतील संसद भवनावर हल्ला, सहा अतिरेकी ठार व सहा सुरक्षारक्षक शहीद.
७. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईतील ताज हॉटेलवर हल्ला, यामध्ये असंख्य लोकांचे प्राण गेले.
८. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू कश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील लेथ्रीपोरा येथे सीआरपीएफ जवानांच्या ताफ्यावर हल्ला, यामध्ये ४० पेक्षा जास्त सैनिकांचा मृत्यू.

याप्रमाणे भारतामध्ये अनेक छोट्या मोठ्या दहशतवादी घटना घडलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने भाजप शासन काळात घडलेल्या घटनांचा आढावा घेणे अपरिहार्य आहे.

**भाजप शासन काळातील प्रमुख दहशतवादी घटना**

१. **विमान अपहरण २४ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २००१ :** भारतात भाजप शासन काळात स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात सरकार असताना, पाकिस्तानमधील आतंकवादी संघटन हरकत-उल-मुजाहिद्दीन यांनी भारतीय एअर लाईन्सचे विमान काठमांडू नेपाळवरून भारतात दिल्ली येथे येणाऱ्या विमानाचे अपहरण करून, अफगाणिस्तानमधील कंधार येथे नेले. या विमानात १७७ प्रवासी होते. या प्रवाशांच्या मोबदल्यात तत्कालीन दहशतवादी जे भारताच्या ताब्यात होते, त्यांना भारतातून मुक्त केले. त्यामध्ये मुस्ताक अहमद जरगर, अहमद शेख व मौलाना मसूद अजहर हे होते. जेव्हा या तीन दहशतवाद्यांना मुक्त केले तेव्हाच या प्रवाशांना सोडण्यात आले.
२. **पुलवामा हल्ला :** भारतीय केंद्रीय सुरक्षा रक्षकांच्या वाहनांचा ताफा स्थलांतरण करीत असताना, जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेने पुलवामा जिल्ह्यातील लेथ्रीपोरा या ठिकाणी जवानांवर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये या संघटनेने आरडीएक्स असलेली गाडी जवानांच्या ताफ्याजवळ नेऊन स्फोट घडवून आणला. या हल्ल्यात ४० च्यावर जवान जागीच ठार झाले व जवळपास ४० जवान जखमी झाले. हा भारतातील सैन्यावरचा सर्वात मोठा हल्ला होता. अलीकडच्या दशकातील ही दहशतवादी घटना सर्वात मोठी घटना मानली जाते.या वेळीसुद्धा केंद्रात भाजपशासित सरकार होते आणि श्री. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान होते.

याप्रमाणे भारतात भाजप शासन काळात अनेक दहशतवादी घटना घडल्या, परंतु त्यापैकी प्रमुख घटनांचा आढावा वरीलप्रमाणे घेतला. या घटनांवर भाजप सरकारने दहशतवाद थांबविण्यासाठी केलेले प्रयत्न पुढीलप्रमाणे आहेत.

**भाजप शासन काळात दहशतवाद रोखण्यासाठी झालेले प्रयत्न**

**अटल बिहारी वाजपेयी यांचा कालखंड**

'आतंकवाद एक नासूर बन गया है। यह मानवता का दुश्मन है।' भारताचे दहावे प्रधानमंत्री म्हणून कार्य सुरू केल्यानंतर भारतात अनेक समस्यांप्रमाणेच पाकिस्तान सारखा शेजारी देश आणि पाक पुरस्कृत दहशतवाद, भारतासाठी डोकेदुखी ठरत होता. वाजपेयी यांच्याच काळात भारतात विमान अपहरणासारखी मोठी दहशतवादी घटना घडली. सोबतच संसदेवरसुद्धा हल्ला झाला. अशा प्रमुख दोन दहशतवादी घटना घडल्यामुळे त्यांनी दहशतवाद रोखण्यासाठी पोटा नावाचा कायदा आणला आणि त्या कायद्यानुसार अनेक संशयित दहशतवाद्यांना शिक्षा दिली.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या कारकिर्दीत पोटा विधेयकाला लोकसभेची मंजुरी मिळाली. परंतु तत्कालीन एनडीए सरकारचे राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे ते विधेयक राज्यसभेत पारित होणे शक्य नव्हते. त्यामुळे ते राज्यसभेत ११३ विरुद्ध ९८ मतांनी नामंजूर झाले. यावर तोडगा काढण्यासाठी वाजपेयी सरकारने संसदेचे संयुक्त अधिवेशन आमंत्रित केले आणि त्यामध्ये ४२५ विरुद्ध २९६ मतांनी हे विधेयक बहुमताने मंजूर केले. त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी

होऊन त्याचे कायद्यात रूपांतर झाले.

या कायद्यातील तरतुदीनुसार दहशतवादी कृत्यांची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष स्वरूपाचे हक्क प्राप्त झाले. याशिवाय या अधिकाऱ्यांनी या कायद्याचा दुरुपयोग करू नये, यासाठी तरतुदी करण्यात आल्या. यामध्ये प्रमुख तरतूद संशयित गुन्हेगारांवर त्यांनी केलेल्या गुन्ह्यासंबंधीची चार्जशीट (आरोपपत्र) दाखल न करता १८० दिवसांपर्यंत डांबून ठेवण्याचा अधिकार पोलिसांना देण्यात आला. अनेक घटक राज्यांमध्ये या कायद्याच्या अंतर्गत ९४० लोकांना अटक करण्यात आली आणि या कायद्याचा दुरुपयोग होतोय, असा जनमानस तयार झाला. २००४ मध्ये भाजप सरकारचा पराभव झाला आणि पुढील डॉ. मनमोहन सिंग सरकारने २००४ मध्ये हा कायदा रद्द केला.

**नरेंद्र मोदी यांचा कालखंड**

२०१४ मध्ये भाजप समवेत एनडीएला अभूतपूर्व यश मिळाले आणि नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाले. भारतात सरकार कोणाचेही असो दहशतवादी कारवाया कधीही संपुष्टात आल्या नाहीत. त्यासाठी अनेक सरकारांनी विविध प्रयत्न केले. त्यापैकी नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कोणते प्रयत्न केले ते पाहणे आवश्यक ठरते.

२०१४ पासून भारतात दहशतवादी हल्ले बघितले तर त्यामध्ये तीन दहशतवादी हल्ले प्रमुख असल्याचे दिसतात. पंजाबमधील पठाणकोट येथे सैन्य दलाच्या तळावर झालेल्या हल्ल्यात सात भारतीय सैनिकांना जीव गमवावा लागला होता. सोबतच उरी येथेसुद्धा दहशतवादी हल्ला झाला होता. येथेसुद्धा १९ सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले होते. तसेच २०१९ च्या निवडणुकी अगोदर केंद्रीय राखीव दलाच्या तुकड्या स्थलांतरित होत असताना त्यांच्यावर पुलवामा या ठिकाणी मोठा हल्ला झाला होता. त्यामध्येसुद्धा ४० सैनिक शहीद झाले होते. बीबीसी न्यूजच्या दाव्यानुसार साऊथ एशियन टेररिझम पोर्टल या संघटनेने प्रकाशित केल्याच्या आधारे २०१४ ते २०१८ या कालावधीत भारतात २८८ दहशतवादी हल्ले झाले आहेत. आजपर्यंत सरकार कोणाचेही असले तरी दहशतवादी हल्ले झाले आहेत, हे कोणीही नाकारू शकत नाही.

**मोदी सरकारने दहशतवाद संपवण्यासाठी केलेले प्रयत्न**

१. **सर्जिकल स्ट्राइक :** १८ सप्टेंबर २०१६ रोजी काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील लष्करी छावणीवर जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने केलेल्या हल्ल्यात १९ जवान शहीद झाले होते. त्याचा बदला म्हणून ११ दिवसांनी २९ सप्टेंबरला सकाळी भारतीय लष्कराने पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये घुसून सर्जिकल हल्ला केला व त्यात ३५ ते ५० दहशतवादी ठार झाले, असा सरकारने दावा केला.

२. **अनुच्छेद ३७० रद्द :** जम्मू-काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे कलम ३० ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने रद्द करण्यात आले. यामुळे जम्मू-काश्मीरची स्वतंत्र राज्य घटना संपुष्टात आली आणि भारतातील इतर सर्व कायदे या राज्याला लागू झाले. परिणामत: पूर्वीला परराष्ट्र व संरक्षण या दोन अधिकारांशिवाय केंद्राला अधिकार नव्हते, परिणामत: तेथील लोकल सरकारमुळे दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या तरतुदी राबवताना अडथळा निर्माण व्हायचा. परंतु हे कलम रद्द झाल्यामुळे व त्याला केंद्रशासित दर्जा प्राप्त झाल्याने, केंद्राने दहशतवाद संपवण्यासाठी आवश्यक ती योजना आखून दहशतवाद रोखण्यासाठी प्रयत्न केले. दहशतवाद रोखण्यासाठी याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर प्रयत्नांप्रमाणेच विविध स्तरावर भारताचे मत मांडून दहशतवाद संपवण्यासाठी अथवा त्यावर प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. अशा प्रकारे भाजप शासन काळातील दोन्ही पंतप्रधानांच्या काळातील झालेल्या प्रमुख दहशतवादी घटना व त्यावर दोन्ही पंतप्रधानांनी केलेले प्रयत्न वरीलप्रमाणे आहेत.

**निष्कर्ष**

भाजप पक्ष हिंदू विचारधारेला अनुसरून असल्यामुळे, या पक्षाच्या नेतृत्वात निर्मित सरकारच्या काळात, मुस्लीम दहशतवादी संघटना अधिक आक्रमक भूमिका घेत असल्याचे जाणवते. त्याचा परिणाम भारतात यांच्या शासन

काळात धार्मिक वातावरण काही प्रमाणात तणावाचेसुद्धा असल्याचे दिसते. असे असले तरी फक्त भाजप शासन काळातच दहशतवादी हल्ले झालेत असे नाही, तर काँग्रेस शासन काळातसुद्धा तेवढ्याच तीव्रतेचे दहशतवादी हल्ले झालेले आहेत. याशिवाय अटल बिहारी वाजपेयी यांनी दहशतवादाला रोखण्यासाठी संशयित व संशयित गुन्हेगाराला पकडण्यासाठी 'पोटा' नावाचा कायदासुद्धा आणला होता. तसेच नरेंद्र मोदी यांनी सर्जिकल स्ट्राइक, कलम ३७० रद्द, नोटबंदी व आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव तंत्र वापरून दहशतवाद रोखण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. थोडक्यात भाजप शासन काळात दहशतवाद रोखण्यासाठी योग्य प्रयत्न झाल्याचे दिसते, परंतु पूर्ण यश आजही भारतात कोणत्याच सरकारला आलेले नाही हे विशेषत्वाने या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

**संदर्भ सूची**


१. वीरेंद्रसिंह यादव (२०११), 'आतंकवाद का समकालीन परिदृश्य स्वरूप एवं समस्याएं', ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली.

२. जे. एन. दीक्षित (२०१०), 'भारत की विदेश नीति और आतंकवाद, ज्ञान पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

३. डॉ. शैलेंद्र देवळाणकर (२०१४), 'आंतरराष्ट्रीय संबंध', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

४. www.bbc.com

५. https:www.behartlife.com

६. www.zeenews.com


■ ■ ■

## * 'विचारमंथन' लेखकांना सूचना : संदर्भ कसे द्यावे *

लिखाण हस्तलिखित असो की टंकलिखित, ते कागदाच्या एकाच बाजूस सुवाच्य असावे, ओळींमध्ये व लिखाणाच्या चारही बाजूंना व्यवस्थित अंतर ठेवावे. लेखात इंग्रजी अवतरणे असल्यास त्यांचे मराठी भाषांतर आधी द्यावे आणि नंतर पदटीप म्हणून इंग्रजी अवतरण द्यावे. व्यक्तींची, ग्रंथांची नावे, लेखांची शीर्षके, पारिभाषिक संज्ञा इ. देवनागरी लिपीत लिहावे. अतिशय अपरिहार्य असेल अशाच ठिकाणी रोमन लिपीचा वापर करावा. लिखाणाच्या शीर्षकानंतर लेखकाने स्वतःचे नाव लिहावे. लिखाणाच्या शेवटी, थोडी जागा सोडून, पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) लिहावा. नावातील आद्याक्षरे मराठी लेखन पद्धतीप्रमाणे द्यावीत. (ए.आर. नको. अ.रा. हवे.) लिखाणाची भाषा शक्यतो सोपी व नेमकी असावी. पुनरूक्ती, अनावश्यक शब्दयोजना, क्लिष्ट वाक्यरचना टाळावी.

लेखकाने आपले लेखन इतरत्र कुठल्याही नियतकालिकात, दैनिकात वा माध्यमात प्रकाशित झालेले नाही, प्रकाशित होण्यासाठी पाठवले गेलेले नाही वा प्रकाशित होण्याच्या प्रक्रियेत नाही, असे स्पष्ट निवेदन करणे आवश्यक आहे संदर्भ देण्याची सोयीस्कर व जागेचा अपव्यय टाळणारी पद्धत पुढे दिली आहे. या पद्धतीचाच आपल्या लेखात उपयोग करावा. लेखात ज्या ठिकाणी संदर्भ द्यावयाचा असेल तेथे कंसामध्ये संबंधित पुस्तक-लेखकाचे नाव द्यावे आणि त्यापुढे संदर्भित पुस्तक/लेखाचे प्रकाशन वर्ष द्यावे. त्यानंतर आवश्यक असल्यास, स्वल्पविराम देऊन पृष्ठक्रमांक लिहावा व कंस पूर्ण करावा. लिखाणाच्या अखेरीस 'संदर्भसूची'मध्ये संदर्भातील सर्व तपशील द्यावेत. सूचीतील प्रत्येक नोंदीतील तपशिलांचा क्रम साधारणपणे असा ठेवावा. लेखकाचे आडनाव स्वल्पविराम, नावांची आद्याक्षरे, प्रकाशन वर्ष, ग्रंथाचे शीर्षक, पूर्णविराम, प्रकाशनसंस्था, स्वल्पविराम, प्रकाशनस्थळ, पूर्णविराम. संदर्भसूची मराठीच्या वर्णक्रमानुसार असावी.